**CNR No.MHNS170000582018**

सदर अर्ज प्रतिवादी क्र.३ तर्फे त्यांचे विरोधात झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करुन उलटतपास करणेस संधी मिळणेसाठी आहे.

०२. अर्ज, शपथपत्र, म्हणणे व प्रकरणाचे अवलोकन केले.

०३. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०४. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, दावा वाटपाचा व मनाई हुकुमाचा आहे. त्याने कैफीयत दाखल केलेली असुन वादीतर्फे पुरावा दिल्यानंतर दावा उलटतपासासाठी नेमलेला होता. परंतु दि. १८/१२/२०२१ रोजी विधिज्ञांचे मुलाची अचानक तब्येत खराब झाल्याने त्यांना मुलासोबत दवाखाण्यात जावे लागले होते. घाईमध्ये त्यांना प्रतिवादीस माहीती देणेही शक्य झाले नाही. अशा परिस्थितीत उलटतपास नाहीचा आदेश झालेला आहे. शेवटी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

०५. समोरील बाजुचे थोडक्यात कथन असे की, नमुद तारखेस अर्जदार प्रतिवादी हजर होता. कुठलाही अर्ज दिलेला नाही. जाणुनबुजुन टाळाटाळ करत आहे. शेवटी अर्ज नामंजुर करणेची व पर्यायाने रुपये दोन हजार खर्चाचा आदेश करणेची विनंती केली.

०६. अर्जास दुजोरा म्हणुन शपथपत्र दाखल आहे. दाव्यात पुढे

प्रगती झालेली नाही. दाव्याचे स्वरुप पाहता समोरील बाजुस खर्चावर संधी देणे आवश्यक आहे, करीता खालील आदेश.

**आदेश**

अर्ज समोरील बाजुस रुपये १००/— (रुपये शंभर फक्त) खर्च देणेवर मंजुर करण्यात येतो.

स्वाक्षरीत/—

दि. ०५/०९/२०२२

(श.गि. दुबाले)

दि.न्या.क.स्तर, नांदगाव.